—: जा ही र नि वि दा :—

संदर्भ :— सहा. अधिक्षक (अभिलेखागार), जिल्हा न्यायालय, चंद्रपूर यांचे पत्र क्र. २०२२/२०२५, दिनांक ०३/०४/२०२५.

जिल्हा न्यायालय, चंद्रपूर यांचे अभिलेखागारातील अभिलेख बांधण्यासाठी ४५''(इंच) X ४५''(इंच) आकाराचे एका बाजुला लांब नाडा असलेले हिरवे बस्ते—३००, लाल बस्ते—४००, काळे बस्ते—२००, केशरी बस्ते—१७००, पिवळे बस्ते—८०० असे एकुण ३४०० बस्त्यांची खरेदी करावयाची आहे. त्या अनुषंगाने खर्चाचा आढावा घेण्याकरीता पुरवठा करण्यास इच्छुक असणाऱ्या स्थानिक पुरवठादार/दुकाणदारानी प्रत्येक बस्त्यांचा प्रति नग दर सर्व करासह नमुद करुन एका सिलबंद लिफाफ्यात कापडाचे नमुन्यासह सादर करण्याकरीता या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर तसेच जिल्हा न्यायालय, चंद्रपूर यांचे https://chandrapur.dcourts.gov.in/notice-category/tenders/ या संकेत स्थळावर प्रसिध्द करुन मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांचे आदेशान्वये स्थानिक दुकानदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे.

करीता इच्छुक पुरवठादारांनी दिनांक २५/०४/२०२५ चे कार्यालयीन वेळ संपेपर्यंत वरील नमुद बस्त्यांचा प्रति नग दर सर्व करासह नमुद करुन एका सिलबंद लिफाफ्यात ज्यावर ''बस्त्यांची निविदा'' असे ठळक नमुद करुन सदर निविदेचा लिफाफा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांचे नावे जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे सादर करावी. तसेच बस्त्याच्या कापडाचा नमुना प्रतवारी तपासण्याकरीता बस्त्याचे कापडाचे नमुने निविदेसोबत सादर करावे. तसेच आदेशानंतर बस्त्यांचा पुरवठा स्वखर्चाने जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे करण्यात यावा.

मुदतीनंतर प्राप्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

चंद्रपूर
दिनांक : ०९/०४/२०२५

09/04/2025
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, चंद्रपूर.